लोकसत्ता पान नं.०१ दि. २८/१०/२२.

## नागपूरमध्ये २२ हजार कोटींची गुंतवणूक आणण्याचा महाराष्ट्र सरकारचा प्रयत्न असफल

# 'एअरबस-टाटा' प्रकल्पही गुजरातमध्ये!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई** : 'वेदान्त-फॉक्सकॉन' प्रकल्पापाठोपाठ 'एअरबस- टाटा' यांचा हवाई दलासाठी विमाननिर्मितीचा सुमारे २२ हजार कोटींचा प्रकल्पही गुजरातला मिळाला आहे. हा प्रकल्प नागपूरमधील मिहानमध्ये सुरू व्हावा, हा शिंदे-फडणवीस सरकारचा प्रयत्न असफल ठरला असून, त्यावरून विरोधकांनी राज्य सरकारला लक्ष्य केले आहे.

'वेदान्त-फॉक्सकॉन' प्रकल्प महाराष्ट्रात सुरू व्हावा, यासाठी आधी महाविकास आघाडी आणि नंतर शिंदे-फडणवीस सरकारने प्रयत्न केले होते. परंतु, हा प्रकल्प गुजरातमध्ये उभारण्याची घोषणा या कंपनीने केली. त्यावेळी 'फॉक्सकॉन' प्रकल्प गुजरातमध्ये गेला असला तरी महाराष्ट्राला तेवढाच मोठा प्रकल्प उभारण्यास केंद्र सरकार मदत (पान ५ वर)

### तीन प्रकल्प राज्याबाहेर

'वेदान्त- फॉक्सकॉन'प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्यात येणार होता. तो प्रकल्प गुजरातमध्ये गेला आहे. 'बल्क ड्रग्ज प्रकल्प' राज्यात उभारण्याची योजना होती. पण, हा प्रकल्प आता आंध्र प्रदेश, गुजरात आणि हिमाचल प्रदेशमध्ये होणार आहे. यापाठोपाठ हवाई दलासाठी विमान निर्मितीचा प्रकल्पही गुजरातला मिळाला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संरक्षणविषयक उपसमितीने सप्टेंबर २०२१ मध्ये हवाई दलाच्या विमान निर्मितीचा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला होता. टाटा आणि एअरबस कंपनीने महाराष्ट्रात प्रकल्प उभारण्याबाबत करार केला नव्हता. मात्र, हा प्रकल्प नागपूरमधील मिहानमध्ये सुरू व्हावा, यासाठी राज्य शासनाने प्रयत्न केले होते.



### स्वतःचे पाप झाकण्याचा प्रयत्न; भाजपचे प्रत्युत्तर

'एअरबस-टाटा' प्रकल्प गुजरातमध्ये उभारण्याचा निर्णय वर्षभरापूर्वीच झालेला असताना आता त्यावर टीका करणे म्हणजे, महाविकास आघाडीने स्वतःचे पाप झाकण्यासारखे आहे, असे प्रत्युत्तर भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत अभियानाची घोषणा केल्यानंतर ८ सप्टेंबर २०२१ रोजी मे. एअरबस आणि स्पेस एसए स्पेन यांच्यातील कराराला मंत्रिमंडळ सुरक्षा समितीने मान्यता दिली. त्यानंतर २४ सप्टेंबर रोजी संरक्षण मंत्रालयाशी सामंजस्य करार झाला. मात्र, हा प्रकल्प महाराष्ट्रात आणण्यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने एकही पत्र पाठवले नाही किंवा कोणताही पाठपुरावा केला नाही. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिशाभूल करू नये, असेही ते म्हणाले.

### हे सरकारचे अपयश : आदित्य ठाकरे

'वेदान्त-फॉक्सकॉन' प्रकल्प महाराष्ट्रातून गेला त्यावेळी किमान विमाननिर्मितीचा प्रकल्प तरी राज्यात खेचून आणा, असे आवाहन आम्ही केले होते. हा प्रकल्प महाराष्ट्रात आणणार, असे राज्याचे उद्योगमंत्री म्हणाले होते. मात्र, हाही प्रकल्प गुजरातमध्ये गेला. त्यामुळे हे सरकारचे अपयश असून, सरकार फक्त स्वतःसाठी काम करत असल्याचे दिसते, अशी टीका शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी केली. हे घटनाबाह्य सरकार आल्यापासून अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेले आहेत, असेही ते म्हणाले.

प्रकल्प गुजरातमध्ये नेण्यासाठीच शिंदे मुख्यमंत्रीपदी : राष्ट्रवादी पान ५

पान नं.०५.


# 'एअरबस-टाटा' प्रकल्पही गुजरातमध्ये!


(पान १ वरून) करेल, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले होते. एअरबस आणि टाटा यांचा प्रकल्प महाराष्ट्रात व्हावा, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले होते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन उद्योगमंत्री सुभाष देसाई आणि राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांनी यांनी हा प्रकल्प राज्यात उभारण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र, हा प्रकल्पही गुजरातला गेल्याचे गुरुवारी स्पष्ट झाले.

भारतीय हवाई दलासाठी सी-२९५ मालवाहू विमानांच्या निर्मितीसाठीचा २२ हजार कोटींचा प्रकल्प गुजरातमधील बडोदा येथे उभारण्यात येईल, अशी घोषणा संरक्षण सचिव अजयकुमार यांनी गुरुवारी नवी दिल्लीत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रविवारी या प्रकल्पाचे भूमिपूजन होणार आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीची घोषणा पुढील आठवड्यात होण्याची शक्यता असून, तत्पूर्वी हा समारंभ होणार आहे.

''या प्रकल्पातून भारतीय हवाई दलासाठी विमानांची निर्मिती होईल. तसेच तेथे तयार झालेल्या विमानांची निर्यातही होणार आहे. यामुळे भारतीय विमाननिर्मिती क्षेत्राला चालना मिळणार आहे,'' असे संरक्षण सचिव अजयकुमार यांनी सांगितले.

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये भारताने एअरबस कंपनीशी २१ हजार कोटींचा करार केला होता. त्याअंतर्गत जुन्या ॲवरो-७४८ विमानांची जागा सी-२९५ ही अत्याधुनिक विमाने घेणार आहेत. बडोद्यातील हा प्रकल्प २१,९३५ कोटी रुपयांचा असून येथे तयार होणारी विमाने प्रवासी वाहतुकीसाठीही वापरली जाऊ शकतात, अशी माहिती कुमार यांनी दिली. विमानाच्या ९६ टक्के भागांची निर्मिती भारतात होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, यात सध्यातरी विमानाच्या इंजिनाचा समावेश नाही.

### देशातील असा पहिला प्रकल्प

सी-२९५ विमानांचा पहिला ताफा (१६ विमाने) सप्टेंबर २०२३ ते ऑगस्ट २०२५ या काळात स्पेनच्या सेविले येथील कारखान्यातून मिळणार आहे. उर्वरित ४० विमाने ही टाटा ॲडव्हान्स सिस्टीम्स या कंपनीच्या भागीदारीतून भारतात तयार केली जातील. भारतात बनलेले पहिले विमान सप्टेंबर २०२६मध्ये वायूदलाच्या ताफ्यात येईल. युरोपच्या बाहेर सी-२९५चे उत्पादन होण्याचीदेखील ही पहिलीच वेळ आहे.

### प्रकल्प गुजरातमध्ये नेण्यासाठीच शिंदे मुख्यमंत्रीपदी : राष्ट्रवादी

राज्यातील मोठे प्रकल्प गुजरातमध्ये जात आहेत. त्यासाठीच भाजपने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदावर विराजमान केले आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते महेश तपासे यांनी केला. जवळपास दीड लाख कोटींच्या 'वेदान्त- फॉक्सकॉन'पाठोपाठ एअरबस-टाटा प्रकल्पही गुजरातमध्ये गेल्याने शिंदे यांना महाराष्ट्रात गुंतवणूक टिकवून ठेवण्यात वारंवार अपयश आल्याचे दिसते. गुजरातचा महाराष्ट्रावर एकप्रकारचा 'सर्जिकल स्ट्राईक' सुरू आहे, अशी टीका तपासे यांनी केली.

दि. २८।१०।१८.

(२) लोकसत्ता पृ. ५।११.०१

# अखेर वारकरी भवनाच्या भूमिपूजनाचा मुहूर्त ३ नोव्हेंबर

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा रोड येथील दहिसर टोल नाक्याजवळ उपलब्ध असलेल्या पालिकेच्या सुविधा भूखंडावर वारकरी भवनाची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामाचे भूमिपूजन येत्या ३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती देशमुख (इंदुरीकर महाराज) यांच्या हस्ते होणार आहे.

शहरात वारकरी भवन तयार करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. त्यामुळे स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांनी पुढाकार घेऊन या संदर्भात पाठपुरावा सुरू केला होता.त्यानुसार दहिसर टोल नाक्याजवळ असलेल्या मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुविधा भूखंडावर वारकरी भवन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष बाब म्हणजे विकासकाला विकास हक्क प्रमाण देऊन हे भवन उभारले जाणार असल्यामुळे पालिकेला कोणताही खर्च उचलावा लागणार नाही आहे. भवन साधारण दोन मजली असणार असून यात एकूण २६४.४० चौ. मीटर इतके बांधकाम केले जाणार आहे. नाट्यगृहात इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होईल, अशी माहिती आयुक्त दिलीप ढोले यांनी दिली.

(३) लोकसत्ता पृ. ५।११.०४

# घरफोडी करणाऱ्या टोळीस अटक

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसईत घरफोडी करणाऱ्या सराईत चोरांच्या टोळीला वालीव पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपींकडून सुमारे साडेचार लाखांच्या मुद्देमालासह १२ गुन्हे उघडकीस आणण्यात वालीव पोलीस गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही महिन्यांपासून घरफोडी होण्याचे प्रकार वाढले आहेत. याप्रकरणी पोलीस ठाण्यातही अनेक तक्रारी येत होत्या. वालीव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने याचा कसून तपास सुरू केला होता. पोलिसांना मिळालेल्या गुप्त आणि तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेत घरफोडी करणाऱ्या चार जणांच्या टोळीला पोलिसांनी अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे, शमीम अन्सारी, बालकराम विश्वकर्मा, वलीउल्ला शफीउल्ला चौधरी, चाँद ऊर्फ हामीद शफीक अहमद रईन अशी आहेत. वालीव पोलीस ठाणे आणि मुंबई येथे दाखल असलेले १२ गुन्हे या टोळीकडून उघडकीस आणण्यात आले आहेत. तसेच गुन्ह्यात चोरी केलेली मोटारसायकल, रोख रक्कम, कंपनीतील लोखंडी आणि स्टील पार्ट, सोन्याचे व चांदीचे दागिने, वाहनाच्या बॅटऱ्या, चाके, मोबाइल असा ४ लाख ६३ हजार किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) मिलिंद साबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

(१) लोकसत्ता पृ. ५।१ ०.०४.

# पालिकेत नोकरी देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**वसई :** मुंबई महापालिकेत नोकरी देण्याच्या बहाण्याने विरारमधील तरुणाची ७२ हजारांना फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ओंकार सावंत (२३) याला त्याचा मित्र प्रथमेश अभ्यंकर याने मुंबई महापालिकेत नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत त्याच्याकडून ७२ हजार रुपये उकळले. बनावट शासकीय दस्तावेज तयार केला होता. मात्र तरी नोकरी मिळालीच नाही, हे लक्षात आल्यावर ओंकारने याने विरार पोलीस ठाण्यात तक्रार केली. विरार पोलिसांनी आरोपी प्रथमेशविरोधात फसवणूक आणि बनावट दस्तावेज तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल दाखल केला आहे.

दि. २८/१०/२२.

(४) महाराष्ट्र टाईम्स पान नं.०३

# नोटेवर हवेत मोदी, बाळासाहेब ठाकरे

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

## केजरीवाल यांच्या विधानानंतर भाजप, शिवसेनेचीही मागणी




दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी नोटांवर गणपती आणि लक्ष्मीचे फोटो छापण्याची मागणी केल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांमध्ये नोटांवर कुणाचे फोटो असावेत या मागणीची जणू चढाओढच लागली आहे. भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो नोटांवर असावा अशी; तर शिवसेनेकडून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेच नोटांवर हवेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

नोटाबंदीवरून उठलेल्या वादळाचे पडसाद अद्यापही उमटत असतानाच बुधवारी नोटांवरून देशात नव्या वादाला तोंड फुटले. दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी नोटांवर देवी लक्ष्मी आणि गणपतीचे छायाचित्र छापण्याची मागणी केली. महात्मा गांधींचे छायाचित्र मात्र राहू द्या, असे ते पंतप्रधान नरेंद्र मोदींना उद्देशून म्हणाले.

अमेरिकी डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया सातत्याने कमजोर होत आहे. त्यामुळे देश नाजूक स्थितीत आहे. सामान्य माणसाला याचा फटका बसत आहे. अर्थव्यवस्थेला रुळावर आणण्यासाठी अनेक प्रयत्न हवेत. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून आपल्या देवी-देवतांचा आशीर्वादही हवा. त्यासाठीच नोटांवर गणपती आणि लक्ष्मीचे छायाचित्र हवे, असे ते म्हणाले होते.

(५) म. टा. पु. पान नं.०१.

# पाच दिवसांत २५ ठिकाणी आगी

म. टा. वृत्तसेवा, वसई

## फटाक्यांमुळे आगीचे प्रमाण अधिक

वसई-विरारमध्ये दिवाळीच्या दरम्यान मागील पाच दिवसांत आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या कालावधीत सुमारे २५ ठिकाणी लहानमोठ्या आगी लागल्या आहेत. सर्वाधिक घटना फटाक्यांमुळे घडल्या आहेत. यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा दिवाळी सणाचा उत्साह मोठ्या प्रमाणावर दिसून आला. त्यामुळे फटाक्यांच्या खरेदीचा उत्साहही अधिक होता. मात्र फटाक्यांच्या आतषबाजीमुळे विविध ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या. या व्यतिरिक्त शॉर्ट सर्किट किंवा अन्य कारणांमुळेही आगी लागल्या. मागील पाच दिवसांत सुमारे २५ ठिकाणी आगी लागल्या आहेत. यामध्ये, वसईच्या अंबाडी रोडवरील शहा कुटुंबीयांच्या घरातील एअर कंडिशनरला आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणून मोठी दुर्घटना रोखली. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दुसऱ्या घटनेत, विरारच्या गोपचरपाडा येथे फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे कापसाच्या गाठींनी पेट घेतल्याने एका गोदामातील सर्व कापूस जळून खाक झाला. मोहक सिटी येथे फटाक्यांतील रॉकेटच्या ठिणग्यांमुळे इमारतीच्या बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या बांबूच्या गोदामाला आग लागली, तर नवापूर येथे रॉकेटच्या ठिणग्यांमुळे नारळाच्या झाडाने पेट घेतला. सर्व ठिकाणी अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेत आग आटोक्यात आणली. दिवाळी, दरम्यान घडलेल्या या सर्व घटनांमध्ये कोठेही जीवितहानी झाली नाही. मात्र अनेक ठिकाणी सामानाचे नुकसान झाले.

(६) म. टा. पु. पान नं.०१.

# भुईगाव समुद्रात अडकली गाडी

म. टा. वृत्तसेवा, वसई



## चालकांची मनमानी

समुद्रकिनाऱ्यावर चारचाकी गाड्यांना बंदी असतानादेखील, भुईगाव, नवापूर, कळंब अशा किनाऱ्यावर अनेक वाहनचालक मनमानी करत आपली वाहने किनाऱ्यावरील वाळून आणत असतात. गेल्या काही वर्षांत भुईगाव, राजोडी आणि कळंब या किनाऱ्यांवर चारचाकी पाण्यात अडकल्याच्या घटना घडल्या आहेत. तरीही पर्यटक यातून कोणताही बोध घेत नसल्याचे दिसत आहे. अशा पर्यटकांवर योग्य कारवाई करून त्यांच्यावर वचक निर्माण करावा, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

समुद्र किनाऱ्यावर चारचाकी पार्क करणे वाहनमालकाच्या अंगलट आले आहे. भुईगाव समुद्रकिनारी सहकुटुंब पर्यटनासाठी आलेल्या एका पर्यटकाने आपली चारचाकी गाडी किनाऱ्यावरच पार्क केली होती. मात्र अचानक आलेल्या भरतीच्या पाण्यामुळे ही चारचाकी समुद्रात ओढली जाऊन तब्बल एक किलोमीटर अंतरावर पाण्यात अडकली आहे.

वसईजवळच्या भुईगाव समुद्रकिनारी वसईबाहेरून एक कुटुंब आपली चारचाकी गाडी घेऊन बुधवारी सायंकाळी फिरण्यासाठी आले होते. त्यांनी ही गाडी समुद्रकिनारी पाण्याच्या अगदी जवळच ठेवली होती. मात्र समुद्राला भरती आल्याने, खवळलेल्या समुद्राने गाडीला आत ओढून घेतले. गाडी समुद्रात अडकल्याचे कळताच चालकाने ती काढण्याचा प्रयत्न केला. मात्र वाळूमध्ये अधिकच खोलवर चाक रुतत गेल्याने गाडी अडकली. याबाबत वसई पोलिसांना माहिती दिल्यानंतर, त्यांनी घटनास्थळी पोहोचून स्थानिकांच्या मदतीने गाडी काढण्याचा प्रयत्न केला. मात्र तो फोल ठरला. त्यामुळे रात्रीच्या वेळी प्रयत्न थांबवून गुरुवारी सकाळी पुन्हा एकदा गाडी काढण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. यासाठी ट्रॅक्टर मागवून त्याच्या मदतीने गाडी काढण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु भरतीमुळे ट्रॅक्टरनेही गाडी बाहेर निघाली नाही. त्यामुळे भरती ओसरण्याची प्रतीक्षा करण्याचा निर्णय घेण्यात आला. गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत गाडी बाहेर काढण्यात यश आले नव्हते. मात्र समुद्राची भरती कमी झाल्यानंतर गाडी बाहेर काढण्यासाठी आम्ही वाट बघत असून लवकरच गाडी बाहेर काढू, असा विश्वास वसई पोलिस निरीक्षक पवाल यांनी व्यक्त केला.

दि. २८/१०/२२

⑤ महाराष्ट्र टाईम्स पुरवणी पान नं.०३

# मुख्यालय भाड्याच्या इमारतीतच

## मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय इमारतीच्या भाडेकराराला दोन वर्षे मुदतवाढ

- मिरा-भाईंदर महापालिकेकडून प्रस्ताव मंजूर
- २०२४ सालापर्यंत मुदतवाढ

**म. टा. वृत्तसेवा,मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी मिरा-भाईंदर महापालिकेची एका इमारत भाड्याने उपलब्ध करून देण्यात आली आहे. या इमारतीचा भाडेकरार संपुष्टात आल्याने त्याला मुदतवाढ देण्याची मागणी पोलिस आयुक्तालयामार्फत करण्यात आली होती. त्यानुसार मिरा-भाईंदर पालिकेने इमारतीच्या भाडेकराराला आणखी दोन वर्षे मुदतवाढ देण्याचा ठराव नुकताच मंजूर केला आहे. त्यामुळे पोलिस मुख्यालयाचे कामकाज आणखी दोन वर्षे भाड्याच्या इमारतीतूनच चालणार असल्याचे बोलले जाते.



मिरा-भाईंदर व वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेला २०१९ साली राज्य सरकारने मंजुरी दिली, तर आयुक्तालयाच्या प्रत्यक्ष कामकाजाला ऑक्टोबर २०२०पासून सुरुवात झाली. त्यापूर्वी, पोलिस आयुक्तपदी सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र वसई-विरार व मिरा-भाईंदर या दोन्ही शहरांमध्ये पोलिस आयुक्तालयाचे कार्यालयीन कामकाज सुरू करण्यासाठी पोलिस प्रशासनाची भव्य इमारत नसल्याने जागेचा तिढा निर्माण झाला होता.

त्यानंतर आयुक्तालयासाठी जागेचा शोध घेताना, राम नगर येथील राष्ट्रसंत आचार्य श्री पद्मसागर सुरीश्वरजी भवन या मिरा-भाईंदर पालिकेच्या इमारतीला पोलिस प्रशासनाकडून पसंती देण्यात आली होती. एकूण ३१ हजार २३४ चौरस फूट क्षेत्रफळाची ही इमारत पोलिस आयुक्तालयासाठी दोन वर्षांच्या मुदतीसाठी दरमहा सुमारे १७ लाख रुपये भाड्याने देण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला होता. या इमारतीच्या अंतर्गत सजावटीचा खर्च पालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

### मुक्काम लांबला

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे कामकाज पालिकेच्या याच इमारतीतून मागील दोन वर्षांपासून सुरू आहे. सप्टेंबर महिन्यात इमारतीचा भाडेकरार संपुष्टात आला आहे. या भाडेकराराला दोन वर्षे मुदतवाढ देण्याची मागणी पोलिस आयुक्तालयाकडून करण्यात आली होती. पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी २०२४ सालापर्यंत भाडेकराराला मुदतवाढ देत, सुधारित भाडे ठरवून घेण्याचा ठराव मंजूर केला आहे. त्यामुळे आणखी दोन वर्षे भाड्याच्या इमारतीतूनच कामकाज होणार आहे.

### निधीअभावी रखडले मुख्यालयाचे काम

मिरा-भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात पोलिस आयुक्तालयासाठी मिरा रोड येथील आरक्षण क्रमांक ३३४ ही ११ हजार ८१५ चौरस मीटर जमीन राखीव ठेवण्यात आली होती. ही जमीन हस्तांतरित करण्यासाठी दहा कोटी रुपयांची मागणी मिरा भाईंदर पालिकेकडून करण्यात आली होती. त्यानुसार राज्य सरकारने १० कोटी रुपये पालिकेला वर्ग केल्याने ही जमीन पोलिस प्रशासनाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. येथे आयुक्तालय तयार करण्याचा आराखडादेखील पोलिस प्रशासनाकडून तयार आहे. मात्र बांधकामासाठी लागणाऱ्या निधीअभावी काम रखडल्याचे सांगितले जात आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

७) पुढारी पान नं. ०१ दि. २८/१०/२२.

# १५ हजार पोलीसपदांची भरती सुरू



**ठाणे :** गेल्या दोन वर्षांत रिक्त झालेल्या पोलिस दलातील तब्बल १४ हजार ९५६ शिपाईपदांची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. ३ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत राज्यातील तरुणांना ऑनलाईन पद्धतीने पोलिस भरतीसाठी राज्यातील कोणत्याही भागातून अर्ज करता येणार आहे. ही पोलिस भरती राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाचवेळी होणार आहे.

● वृत्त पान २

पान नं. ०२.

# १५ हजार पोलिसपदांची भरती

## ३ ते ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज स्वीकारणार

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

गेल्या दोन वर्षांत रिक्त झालेल्या पोलीस दलातील तब्बल १४ हजार ९५६ शिपाईपदांची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. ३ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत राज्यातील तरुणांना ऑनलाईन पद्धतीने पोलीस भरतीसाठी राज्यातील कोणत्याही भागातून अर्ज करता येणार आहे. ही पोलीस भरती राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाचवेळी होणार आहे.

१ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२१ या गेल्या दोन वर्षांत पोलीस दलात १४ हजार ९५६ पोलीस शिपाई निवृत्त झाल्याने ही पदे रिक्त झाली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेली रिक्त पदे भरण्यात आलेली नसल्याने ती संख्या वाढत असल्याने इतर पोलिसांवर कामाचा ताण वाढत आहे. दुसरीकडे एवढ्या मोठ्या प्रमाणावर तरुण नोकरीपासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस भरतीची प्रक्रिया राबवून बेरोजगार तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली आहे.

**येथे करा अर्ज**

● या पदांकरिता ३ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत www.mahapolice.gov.in, policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळांवर ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे.

खुला वर्ग, महिला तसेच खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, अंशकालीन पदवीधर, पोलीस पाल्य, गृहरक्षक दल आणि अनाथ मुलांसाठी एक टक्का जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

मुंबईमध्ये सर्वाधिक ६ हजार ७४० पदांसाठी भरती होणार आहे. नव्याने निर्माण झालेले मीरा-भाईंदर आयुक्तालयात ९८६ पदे, तर ठाणे शहर-ग्रामीणमधील ५८९ जागा आहेत. लोहमार्ग मुंबई ६२०, नवी मुंबई २०४, पालघर २११, रायगड २७२, रत्नागिरी १३१, सिंधुदुर्ग ९९, नाशिक ग्रामीण ४५४, कोल्हापूर २४, सोलापूर ग्रामीण २६, सातारा १४५, सोलापूर शहर ९८, पुणे ग्रामीण ५७९, पुणे शहर ७२०, पिंपरी-चिंचवड २१६ आदी ३८ आस्थापनांमध्ये भरती होणार आहे. त्यात ५ हजार ४६८ पदे ही खुल्या गटासाठी असून ईडब्ल्यूएस १५४४ जागा, ओबीसीकरिता २९२६ पदे भरण्यात येणार आहेत.

दि. २८/१०/२२

(१७) पुढारी पान नं.०४

# वसईत शिधावाटप न झाल्याने वंचितची तहसीलवर धडक

## ८५ टक्के जनता शिधावाटपापासून वंचित



तहसीलदार कार्यालयातील कर्मचाऱ्याकडे निवेदन सुपूर्द करताना आंदोलक

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसईतील शिधा वाटप केंद्रांना शिधा वाटप होत नसल्याने वंचित बहुजन आघाडीने वसई तहसीलदार कार्यालयासमोर आज गुरुवारी दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत आंदोलन करण्यासाठी आले होते मात्र तहसीलदारांसह अनेकांनी आज कार्यालयाला दांडी मारली असल्याचे दिसून आले.

शिंदे-फडणवीस सरकारने सामन्यांची दिवाळी गोड होण्यासाठी १०० रुपयात १ लिटर पामतेल, १ किलो रवा, १ किलो, चणाडाळ १ किलो साखर या वस्तू जाहीर केल्याने महाराष्ट्रातील सामान्य जनतेला दिलासा वाटला होता. आता भाऊबीज झाली तरी अनेक लोकांना संपूर्ण कीट मिळाले नसल्याने वंचित बहुजन आघाडीच्या वतीने याच्या निषेधार्थ तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार होता मात्र तहसीलदारच गायब असल्याने दाद कोणाकडे मागावी असा सवाल वसई विरार महिला जिल्हाध्यक्ष गीता जाधव यांनी उपस्थित केला आहे.

महाराष्ट्र सरकारने सामान्य जनतेला दिलासा दिला होता की या वर्षाची दिवाळी आनंदाची जाईल आणि सरकारने जाहीर केले होते की सामान्य जनतेला शिधा वाटप केंद्रावर शंभर रुपयाचे किट त्या किट मध्ये १ लिटर पामतेल, १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर हे मिळणार होते, पण इथे सरकारने जनतेची शुद्ध फसवणूक केली आहे. वसई तालुक्यामध्ये हे धान्याचे किट दिवाळी सरायला आली तरी अद्यापही कुठेच हे पूर्ण किट हे सामान्य जनतेला मिळालेले नाही. काही दुकानांवर एक वस्तू, दोन वस्तू किंवा तीन वस्तू अशा मिळत आहेत. तर काही ठिकाणी काहीच नाही. कुठेतरी शिंदे सरकार आणि फडणवीस सरकार हे अपयशी ठरलेले आहे असं वंचित बहुजन महिला आघाडी वसई विरार महानगरपालिका क्षेत्र जिल्हाच्या महिला अध्यक्ष गीता जाधव यांचे म्हणणे आहे.

दरम्यान पुरवठा विभागाचे अरुण यांनी सांगितले कि संपूर्ण किटचा अद्याप पुरवठा झाला नसून १५ टक्के लोकांनाच कीट देण्यात आले असून लवकरच कीट वितरीत केले जाईल असे त्यांनी वंचीत आघाडीच्या कार्यकर्त्यांना सांगितले.

### राज्य सरकारची केली पोलखोल

दिनांक २५ ऑक्टोबर रोजी वसई विरार शहर वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष संतोष कवडे व विरार शहर कमिटी उपाध्यक्ष उत्तम जाधव, प्रमोद तांबे, जनार्धन लोखंडे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी विरार मधील रेशन दुकानांवर भेट देऊन महाराष्ट्र राज्य सरकारची पोल खोल केली आहे. आणि जनतेमधील झालेला असंतोष सरकारपर्यंत पोहोचवण्याचे काम वंचित बहुजन आघाडी करणार आहे. त्यासाठी वंचित बहुजन आघाडी वसई विरार महानगरपालिका क्षेत्रचे अध्यक्ष संजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली वसई तहसीलवर धडक देवून तहसीलदार, नायब तहसीलदार गायब असल्याने एका कर्मचाऱ्या कडे निवेदन सुपूर्त केले. जर ४ दिवसात संपूर्ण किट न दिल्यास वंचित बहुजन आघाडी आपल्या पद्धतीने तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा वंचितच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे.

दि. २८/१०/२२

(११) पुढारी पान नं.०८

# आरक्षित भूखंड खासगी शैक्षणिक संस्थांना विकले

## आ. प्रताप सरनाईक यांची मुख्यमंत्र्यांकडे गुन्हे शाखेमार्फत चौकशीची मागणी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने प्रथमिक व माध्यमिक शाळांसाठी आरक्षित केलेल्या भूखंडांपैकी दोन आरक्षणे पालिकेतीलच काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी स्थानिक नेत्याच्या संगनमताने शासनाची कोणतीही परवानगी न घेता परस्पर शहरातील दोन बड्या शैक्षणिक संस्थांना विकल्याचा आरोप आ. प्रताप सरनाईक यांनी केला आहे. त्याची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

शहरातील १० शैक्षणिक आरक्षणांच्या जागा पालिकेने भाडेतत्वावर देण्याचा ठराव नुकत्याच पार पडलेल्या प्रशासकीय बैठकीत मंजूर केला आहे. हि आरक्षणे भाडेतत्वाच्या नावाखाली गिळंकृत करण्यासाठी शहरातील अनेक राजकीय तसेच शिक्षण सम्राटांनी तयारी चालविली असताना शहरातील दोन शैक्षणिक आरक्षणे भाडेतत्वावर न देता ती परस्पर विकण्यात आल्याचा आरोप सरनाईक यांनी केला आहे. यात आरक्षण क्रमांक २५२ वरील ५ हजार चौरस मीटर जागा शाळेसाठी आरक्षित असून एकूण जागेपैकी २,१४९.४६ चौमी जागा पालिकेच्या ताब्यात आली होती. तसेच आरक्षण क्रमांक ३२८ वरील १० चौमी जागा शाळेसाठी आरक्षित असून एकूण जागेपैकी १ हजार ३६१ चौमी एवढी जागा पालिकेच्या ताब्यात आली होती. हि आरक्षणे पालिकेने स्वत:च्या निधीतून अथवा कंस्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून संबंधित विकासकाकडून विकसित करून घेणे आवश्यक होते. पण पालिकेतील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी शहरातील एका नेत्याच्या संगनमताने शहरातील शिक्षण सम्राट लल्लन तिवारी यांच्या श्री राहुल एज्युकेशन सोसायटी व विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थांना परस्पर विकल्याचे आरोप सरनाईक यांनी केला आहे. त्यासाठी काही नेत्यांच्या वैयक्तिक फायद्याकरीता शासनाची कोणतीही परवानगी न घेता पालिकेला नाममात्र पैसे देऊन उर्वरीत पैसे त्या अधिकाऱ्यांनी व त्या नेत्याने स्वत:च्या खिशात टाकल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

### भ्रष्ट नेत्यांनी सत्तेचा केला दुरुपयोग

वास्तविक पालिकेच्या मालकीची कुठलीही जागा अथवा आरक्षित भूखंड शासनाची परवानगी न घेता परस्पर विकता येत नसल्याचा दावा सरनाईक यांनी केला आहे. तसेच हे आरक्षित भूखंड पालिकेने ठाणे महापालिकेच्या धर्तीवर पालिकेच्या उत्पनाचा स्त्रोत वाढविण्यासाठी भाडेतत्वावर देणे गरजेचे होते. मात्र शहरातील काही भ्रष्ट नेत्यांनी सत्तेचा दुरुपयोग करून स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी पालिकेतील अधिकाऱ्यांना हाताशी धरून हा बेकायदेशीर प्रकार केल्याचा आरोप करीत त्यांनी पालिकेने हे भूखंड ताब्यात घेऊन गरीब विद्यार्थ्यांना त्याचा फायदा कसा होईल? यासाठी शासनाने कारवाई करावी, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

(१२) पुढारी पु.पान नं.०७.

# अनधिकृत फटाके विक्री; दुकानदारांवर गुन्हा

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक नाका येथील स्वामी समर्थ फायर वर्क्स याला फटाके विक्रीसाठी अग्निशमन दलाने नाहरकत दाखला दिला होता. या दुकानदाराच्या अनेक तक्रारी आल्यामुळे मंगळवारी अग्निशमन दलाने पाहणी केली असता फटाका विक्रेत्याने नियमांचे उल्लंघन करत फुटपाथवर फटाके विक्री करत असल्यामुळे अग्निशमन विभागाने नवघर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिरा-भाईंदर महापालिकेने दिवाळीसाठी फटाके विक्री करण्यासाठी अटी शर्तीनुसार विविध ठिकाणी स्टॉल लावण्यासाठी परवानगी दिली आहे. अनेक ठिकाणी स्टॉल धारक हे नियमांचे उल्लंघन करत फटाके विक्री करत होते. याच्या तक्रारी पालिकेकेकडे आल्यामुळे अग्निशमन विभागाने मंगळवारी पाहणी करत असताना भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक परिसरातील स्वामी समर्थ फायर वर्क्स या स्टॉल धारकाने नियमांचे उल्लंघन करत रस्त्यावरील फूटपाथवर स्टॉल लावल्याचे दिसून आले. या स्टॉलमुळे मुख्य रस्त्यावरून रहदारी करणाऱ्या रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. फटाका विक्रेत्याने अटीशर्तीचे उल्लंघन केल्याने अग्निशमन दलाने परवाना रद्द करत त्याचा माल जप्त करण्याची कारवाई केली. त्या नंतर अग्निशमन केंद्र अधिकारी दिलीप रणावरे यांनी नवघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून फटाका स्टॉल मधील विक्रेते सेल्वराज षणमुगम व जितेंद्र गडकर ह्या दोघांवर नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फटाके विक्रेता सेल्वराज षणमुगम याने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मीरा भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे.

दि. २८/१०/२२

(१२) पुढारी पु.पान नं.०३

# पालिका कर्मचाऱ्यांना नाट्यगृह तिकीटात सवलत द्यावी

## श्रमजीवी संघटनेचे विवेक पंडित यांची मिरा-भाईंदर पालिका आयुक्तांकडे मागणी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने दहिसर चेकनाका येथे कन्स्ट्रक्शन टिडीआरच्या माध्यमातून साकारलेल्या भारतरत्न स्व. लता मंगेशकर नाट्यगृहाच्या तिकीटात पालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ५० टक्के सवलत द्यावी यासाठी नाट्यगृहातील आसन व्यवस्थेत १ टक्का आसने राखीव ठेवण्यात यावीत, अशी मागणी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित यांनी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

मिरा भाईंदर शहरात सर्व धर्मांचे व भाषांचे लोकं राहतात. या शहरात परप्रांतीयांची संख्या मोठ्याप्रमाणात वाढली असली तरी त्यातील



काही परप्रांतीय लोकांचा शहराच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. महाराष्ट्रातील मराठी लोकांनी जशी आपली संस्कृती जपली असली तरी इतर भाषिकांकडून आपापली संस्कृतीत जपली जात असून तसे सण देखील साजरे केले जात आहेत. यातील मराठीप्रमाणेच हिंदी, गुजराती, बंगाली आदी भाषिकांनी आपापली नाट्यसंस्कृती जपली असून या भाषांमधील नाटकं मोठ्याप्रमाणात प्रदर्शित होत असतात. मात्र राज्यात मराठी पाठोपाठ प्रामुख्याने मुंबई व उपनगरांमधील नाट्यगृहात गुजराती नाटकांचे काही प्रयोग केले जातात. ही नाटके पाहण्यासाठी शहरातील प्रत्येक नाट्यरसिकाला आपापल्या भाषेतील नाटक पाहण्यासाठी बोरीवली, दादर, ठाणे, गिरगाव येथे जावे लागते.नाट्यरसिकांची इतर शहरातील पायपीट थांबविण्याच्या उद्देशाने पालिकेने शहरातच नवीन व भव्य नाट्यगृह साकारले आहे. यामुळे शहरातील नाट्यरसिकांना शहरातच नाटक पाहण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे. यातच पालिकेत सुमारे ९९ टक्के अधिकारी, कर्मचारी मराठी भाषिक असून त्यातील बहुतांशी अधिकारी व कर्मचारी नाट्यरसिक आहेत. त्यांना सुट्टीच्या दिवशी तसेच कार्यालयीन वेळेनंतर सहकुटूंब शहरातीलच नाट्यगृहात नाटक पाहण्यासाठी जाता येणार आहे. हे नाट्यगृह पालिकेने भाजप आ. पराग शाह यांना ५ वर्षांकरीता चालविण्यासाठी दिले आहे. नाट्यगृहाचे खाजगीकरण झाल्याने त्यातील नाटकांचा

तिकीट दर काहीसा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. नाटकांच्या तिकीटाचे दर पालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना परवडणारे ठरणार नाही. त्यामुळे या नाट्यगृहातील नाटकांच्या तिकीट दरातून सवलत देण्यात यावी, अशी मागणी पंडित यांनी केली आहे.

---

(१४) सकाळ पु.पान नं.०४

# 'फरारी आरोपी दिसताच विरार पोलिसांना कळवा'

नालासोपारा, ता. २७ (बातमीदार) : पत्नीचा छळ करून अत्याचार करणारा आरोपी पतीला सिटी सिव्हिल सेशन कोर्ट ग्रेटर बॉम्बे, अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी विक्रोळी या न्यायालयाने फरारी घोषित केले. हा आरोपी मुंबई, पुणे, ठाणे, वसई, विरारसह पालघर जिल्ह्यात कुठेही दिसल्यास त्याची माहिती पोलिसांना तात्काळ द्यावी, असे आवाहन विरार पोलिसांनी केले.



अभय साखले

अभय साखले असे फरारी घोषित केलेल्या आरोपीचे नाव असून हा आरोपी विरार पश्चिम एम बी इस्टेट पूनम टॉवरमधील राहणारा आहे. या आरोपीचे त्याच्या पत्नीसोबत कौटुंबिक वाद निर्माण झाले होते. यावरून पत्नी धनश्री यांनी सिटी सिव्हिल सेशन कोर्ट ग्रेटर बॉम्बे आणि विक्रोळी अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांच्याकडे खटले दाखल केले होते. यावरून खटला सुरू असताना आरोपी पती हजर होत नसल्याने न्यायालयाने त्याला फरारी घोषित केले.

---

(१५) सकाळ पु.पान नं.०२

# हप्त्यासाठी रिक्षाचालकाला ठार मारण्याची धमकी

## आचोळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नालासोपारा, ता. २७ (बातमीदार) : नालासोपाऱ्यात रिक्षा माफियांची दादागिरी दिवसागणिक वाढत चालली आहे. रिक्षा थांब्यावर रिक्षा लावायची असेल तर दरमहिना दोन हजार रुपये द्यावे लागतील, दिले नाही तर ठार मारले जाईल, अशी धमकीच एका रिक्षा माफियाने रिक्षाचालकाला दिली असल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. याबाबत आचोळे पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

भावेश चौहान ऊर्फ लालू, प्रभाकर सिंग चौहान, अभिषेक चौहान ऊर्फ मुलायम असे गुन्हा दाखल झालेल्या रिक्षा माफियांची नावे आहेत. हे तिघेही नालासोपारा पूर्व कॅपिटल मॉलजवळील परिसरात राहणारे आहेत. राहुल राय असे तक्रारदार रिक्षाचालकाचे नाव आहे. नालासोपारा पूर्व अलकापुरी या भागात तक्रारदार हा मागील आठ वर्षांपासून रिक्षा चालवतो. याच अलकापुरी परिसरात आरोपी भावेश ऊर्फ लालू याच्या १५ ते २० रिक्षा आहेत. अलकापुरी परिसरात या रिक्षा माफियांची दादागिरी चालत असून, अलकापुरी रिक्षा थांब्यावर जर रिक्षा थांबवून धंदा करायचा असेल तर दिवसाला ५० रुपये आणि महिन्याला दोन हजार रुपये प्रत्येक रिक्षाचालकाकडून जबरदस्तीने वसुली करतो. जर रिक्षाचा हप्ता नाही दिला तर सर्वसामान्य रिक्षाचालकांना धमकावणे, ठार मारण्याच्या धमक्या देतो, असा आरोप तक्रारदार रिक्षाचालकाने केला आहे.

दि. २८/१०/२२

(१६) लोकमत पु. पान नं. ०३

# रांगोळी काढताना दाराचा धक्का लागल्याने मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** दिवाळीनिमित्त दाराबाहेर रांगोळी काढताना शेजारच्या महिलेने दार उघडल्याने धक्का लागला. धक्का लागल्याचा जाब विचारला, म्हणून रांगोळी काढणाऱ्या महिलेसह तिच्या कुटुंबीयांना मारहाण केल्याप्रकरणी शेजारी कुटुंबीयांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेच्या नर्मदानगरमधील नर्मदा अभिषेक इमारतीत राहणाऱ्या पूनम महतो (३२) या २४ ऑक्टोबरला दाराबाहेर रांगोळी काढत होत्या. त्यावेळी शेजारी राहणाऱ्या मेघा अग्रवाल (३२) हिने तिच्या घराच्या दरवाजाला धक्का दिल्याने तो पूनम यांना लागला. पूनम यांनी दरवाजा लागल्याबद्दल विचारणा केली असता, मेघा ही व्हिडीओ काढू लागली. व्हिडीओ का काढते, म्हणून पूनम यांनी विचारले असता, मेघाचा पती सुरेंद्र याने शिवीगाळ व दमदाटी सुरू केली.

मेघाचे भाऊ अतुल व अंकित अग्रवाल यांनी पूनम यांना धक्काबुक्की, मारहाण व शिवीगाळ सुरु केली. मेघा ही पूनमचे केस धरून तिला मारहाण करत होती. ते पाहून पूनमचा पती व दीर वाचविण्यासाठी आले असता, त्यांनाही मारहाण केली.

पोलिसांनी मेघासह तिचा पती सुरेंद्र व भाऊ अंकित आणि अतुल अशा चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

(१७) लोकमत पु. पान नं. ०२

# मीरा रोडमध्ये दुचाकी पळवली

**मीरा रोड :** मीरा रोडच्या जीसीसी क्लबजवळील एव्हरग्रीन सिटीमध्ये राहणारे शुभम दुबे हा आकृती हबटाऊन गार्डन येथे राहणाऱ्या मित्राकडे गेला होता. त्यावेळी त्याने दुचाकी सार्वजनिक रस्त्यावर उभी केली होती. मित्राला भेटून दुबे परत आला असता त्याची २५ हजारांची दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(१८) पुण्यनगरी पु. पान नं. ०३.

# अवैध बांधकाम करून हजारो कुटुंबांची फसवणूक करणाऱ्या बिल्डरांवर भाजपकडून कारवाईची मागणी

**नालासोपारा :** दोन दिवसांपूर्वी नालासोपारा पूर्वेकडील सेंट्रल पार्क, ओसवाल नगरी येथील फटाक्यांच्या दुकानाला आग लागली होती. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. असे असले तरी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी वसई-विरार महापालिका आयुक्तांनी परिसरात सुरू असलेल्या सर्व फटाक्यांच्या दुकानांच्या परवानग्या तपासून बेकायदा दुकानांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या अंतर्गत १२ फटाका विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या दुकानांवर कारवाई झाली नसती तरीदेखील दिवाळीनंतर ही सर्व दुकाने आपोआप बंद झाली असती. मात्र, हजारो नागरिकांना बेकायदा घरे देणाऱ्या विकासकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी वसई-विरार भाजप जिल्हाध्यक्ष मनोज बारोट यांनी केली आहे.

भाजपचे वसई-विरार जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिल पवार यांना पत्र लिहून ही मागणी केली आहे. ओसवाल नगरी येथील घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, तरीही क्षेत्रातील सर्व फटक्याच्या दुकानांची तपासणी करून परवानगीशिवाय सुरू असलेल्या दुकानांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

परंतु मागील काही महिन्यांत पालिका क्षेत्रात अवैध निर्माणामुळे अनेक घटनेत अनेक निष्पाप नागरिकांनी आपले जीव गमावले आहे. मग तेव्हा प्रशासन अशा प्रकारे परिसरातील सर्व अवैध निर्मात्यांच्या शोध लावून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मोहीम का हाती घेत नाही? आणि फक्त घटनेशी संबंधित लोकांवरच कारवाई का केली जाते? असा सवालदेखील त्यांनी केला आहे. पालिका आयुक्तांनी वसई तालुक्याच्या सर्वसामान्य जनतेला त्याचे उत्तर द्यावे, मनपा प्रशासनाला खरोखर नागरिकांच्या सुरक्षेची काळजी असेल तर परिसरात ३६५ दिवस बेकायदा बांधकामे करून कोटयवधी रुपयांचा महसूल बुडवून, हजारो कुटुंबांची फसवणूक करून निष्पाप नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या बिल्डरवर अशी कारवाई का केली जात नाही? तसेच क्षेत्रातील अवैध निर्माण करणाऱ्यांना शोधून त्यांचावर गुन्हे दाखल करण्याची मोहीम कधी सुरू करणार आहे? असा सवाल बारोट यांनी उपस्थित केला आहे.